REGISTERED No. B. 3454

जाहिरातींचे दर,
खालील पत्त्यावर चोकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर,
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २२ नोव्हेंबर, १९४४ अंक ४६




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

देना बँक
देवकरण नानजी बँकींग के. लिमिटेड.
देना बँकेच्या ग्राहकांसाठीं
इन्व्हेस्टमेंट सर्व्हिस
तपशीलाकरितां भेटा अगर लिहा :
हेड ऑफिस : मुंबई आणि स्थानिक शाखा
देना बँकेच्या स्थानिक कचेऱ्यांत हिंदुस्थान सरकारचे प्राइझ बॉंडस विकत मिळतात.

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
स्थापना : १९३५
हेड ऑफिस : पुणें शहर
विक्रीस काढलेलें नवीन भांडवल
रु. १०,००,०००
( प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें )

वरील शेअर्स ता. ४-१०-४४ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या १ शेअरला १ नवीन शेअर असे रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांस तेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यात येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५-१२-४४ ही आहे.

—डायरेक्टर बोर्ड—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन
श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एस. जी. मराठे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.
विशेष माहितीसाठी लिहा.
सी. व्ही. जोग, मॅनेजर

मांडू हार्टिना
ओरिजिनल
ब्राम्ही तेलाचे
कारखानदार.
द. कृ. मांडू ब्रदर्स, वॅंगूर, लिमिटेड.
धन्वंतरी बिल्डिंग्ज ...
... मुंबई

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
रविवार पेठ, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कॅंप टाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. छोणकर, एम्. ए., बी. कॉम्., १२८९ अ, शिवाजीनगर, पुणें ५)

सुमारें दीड महिन्यापूर्वी 'अर्था' त सुचविलें होतें कीं गुंतविणारांनीं जे शेअर्स संख्येनें कमी व आकारानें ल्हान असे उचलावेत. त्यांमध्यें किती जोरदार तेजी झाली आहे हें त्यावेळचे भाव व परवाच्या शुक्रवारचे बंद भाव हे पडताळून पाहिलें असतां दिसून येईल. साधारणतः अपोलो ३।९ वरून ४।७, इ. डी. २।११ वरून ३।६, मोरारजी ५९० वरून ६६०, इंदूर ६६५ वरून ७८७।८, सिंप्लेक्स २३१ वरून २६३ असे आहेत. गाळे विकणारांविरुद्ध आहेत त्यावरून बाजार 'वृषभी' (Bullish) आहे व जोपर्यंत ते तेजीवाल्यांच्या बरेचसे विरुद्ध जाणार नाहींत तोंपर्यंत तो 'ऋषभी' (Bearish) होईल असें मानण्याचें कारण नाहीं. आतांपर्यंत एकएक निवडक शेअर्स वर जात होते. मागील आठवड्यांत मात्र झालेली तेजी सर्वसाधारण आहे आणि मंदीवाल्यांची कापाकापी बरीच झाली, यावरून प्रमुख भावना तेजीचीच झालेली आहे असें दिसून येईल. टाटाची व्याजें पुढील-वर्षी कमी होण्याचें कारण दिसत नाहीं. आतांपर्यंतची त्यांची कमाई पूर्ववत कायम आहे असें ऐकिवांत येते. तसेंच सिमेंटलाही नफा उत्तम झाला आहे व भांडवल वाढविणार अशी बातमी आहे. अशा पक्षीं ऑर्डिनरी व डिफर्ड ३८१ वरून ३९७।८ व २०६६।४ वरून २१३६ आणि सिमेंट २३१ वरून २४३ पर्यंत चांगलेच मजबूत आहेत. ३॥ टक्क्याचें परवां शतक गांठलें. १९४३ च्या फेब्रुवारीपासून भाव ९४-९५ होते तेव्हांपासून तो घेऊन ठेवणें श्रेयस्कर आहे व भाव चढले तरी पडावयाचें नाहींत याचीं कारणें तितकीच जबरदस्त आहेत हें 'अर्था'त आम्हीं एकसारखें प्रतिपादन करीत आलों आहोंत व त्याप्रमाणें घडलें आहे असें म्हटलें असतां अनौचित्याचा दोष मात्र आमच्या पदरीं येईल. असो एकंदरीनें मध्यंतरी बाजार शांतता होणार म्हणून जो उगाचच भलतीकडे पडला होता तो शहाण्यासारखा वर आला आहे. तो, किरकोळ बातम्या सोडतां, वरच राहील असें वाटतें.

### सोन्याच्या खाणींपासून म्हैसूर सरकारची प्राप्ती

म्हैसूर संस्थानांतील सोन्याच्या खाणींचें एकूण उत्पादन १९४३-४४ मध्यें २,२१,९७६ औंस झालें. १७,७२८ औंस चांदी निघाली. त्या दोघांची मिळून किंमत ४ कोटि, ३६ लक्ष रुपये भरली. रॉयल्टीबद्दल म्हैसूर सरकारचा त्या किंमतीमधील वाटा २० लक्ष रुपयांचा असून सोन्यावरील जकातीचें उत्पन्न १ कोटि, ६० लक्ष रुपयांपेक्षा अधिक आहे. संस्थानांतील खाणींत २३½ हजार लोक काम करीत आहेत, त्यांपैकीं एकट्या सोन्याचे खाणींतच २०½ हजार कामगार आहेत. खनिज धातूंबाबत जनतेचें कुतूहल वाढत आहेत. नव्या खाणी खणण्याचा परवाना मागणारे १७२ अर्ज गेल्या वर्षीं संस्थानाच्या सरकारकडे दाखल झाले.

## विविध माहिती

### अमेरिकन रेडिओंची आयात

उधार-उसनवार व्यवस्थेखालीं ४०,९१७ रेडिओ अमेरिकेंतून ह्या देशांत आयात करण्यांत आले आहेत. त्यांपैकीं २७,७०१ रेडिओ खासगी व्यापाऱ्यांमार्फत विकण्यांत आले. त्यांचे बाबतींत मुद्दांत ठरल्याप्रमाणें उधार-उसनवार पद्धतीचा अवलंब करतां आला नाहीं आणि त्यांची किंमत डॉलर्सच्या स्वरूपांत रोखीनें यावी लागली.

### ओडिअन थिएटर्स, लि.

ग्रेट ब्रिटनमधील ओडिअन थिएटर्स लि. च्या थिएटरांत गेल्या वर्षीं एकूण १८ कोटि प्रेक्षकांनीं बसून खेळपट पाहिले. तिकिटविक्रीचें उत्पन्न १ कोटि, ६० लक्ष पौंड आलें, त्यांपैकीं ८० लक्ष पौंड करापायीं भरावे लागले. एकूण उत्पन्नापैकीं करमणुकीच्या कराच्या वाट्यास युद्धापूर्वी १३% रकम जात असे; आतां हें प्रमाण ३९% झालें आहे. सबंद जगभर थिएटरांचें जाळें पसरविण्याची व फिल्म्स तयार करणाऱ्या कांहीं स्टुडिओवर निर्णायक अधिकार मिळविण्याची कंपनीची पूर्वतयारी चालू आहे. कंपनीच्या भागीदारांस गेल्या वर्षाच्या नफ्यावर २०% डिव्हिडंड मिळालें.

### आगबोटींचा तुटवडा, परंतु मिशनऱ्यांस प्राधान्य

१०६ मिशनऱ्यांना हिंदुस्थानांत येण्यास ब्रिटिश सरकारनें खास वहातुकीची सवलत दिली आहे. आणखी बराच काळ वहातुकीची अडचण तीव्र रहाणार असली, तरी मिशनरी सोसायट्यांच्या विनंतीचा सहानुभूतिपर विचार केला जाईल, असें मि. एमरी ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

### पुणें शहरांतील दोन कंपन्यांमधील औद्योगिक वांधे

पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी लि. व तिचे कामगार ह्यांचेमधील वांध्यामध्यें पंच म्हणून मि. ई. एम. नानावटी ह्यांची मुंबई सरकारनें नेमणूक केली आहे. सद्र्न निटिंग वर्क्समधील संप श्री. बापुसाहेब गुते ह्यांच्या मध्यस्थीनें मिटला आहे.

### दौंड-बारामती रेल्वे कं. लि.

दौंड-बारामती रेल्वे कं. लि. ची खास साधारण सभा नुकतीच भरली होती, तीमध्यें कंपनी गुंडाळण्यांत यावी व त्यासाठी श्री. पी. के. गोडबोले व मि. एन. जी. भरूचा ह्यांस लिक्विडेटर नेमण्यांत यावें, असें ठरलें.

### एक रुपयावाल्या नव्या नोटा

नव्या एक रुपयावाल्या चलनी नोटा लवकरच व्यवहारांत खेळूं लागतील. सध्याच्या नोटांपेक्षा ह्या नोटा फारशा वेगळ्या नाहींत.

### हिंदी आर्थिक परिषद

हिंदी आर्थिक परिषदेचें २० वें अधिवेशन दिल्ली येथें ता. ३० व ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी रोजीं अलिगडच्या मुस्लिम विश्वविद्यालयांतील प्रो. हैदर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे.

गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३७८ |
| २ शेअर बाजार ... | ३७८ |
| ३ असेंब्लीमधील कांहीं प्रश्नोत्तरें ... ... | ३७९ |
| ४ "फेडरल कोर्टास काम द्या" ... ... | ३८० |
| ५ स्फुट विचार... ... | ३८१ |
| जनसेवा कीं नफेबाजी—स्वस्त अन्नपुरवठ्यास सरकारी सहाय—फूड ॲडव्हायसरी कौन्सिल—अमेरिकन गिरण्या व युद्धोत्तर स्पर्धा—चंदनाचें तेल. | |
| ६ मद्यनिषेधणाची बंदी... | ३८२ |
| ७ यांत्रिक हत्यारांचा धंदा | ३८२ |
| ८ शेअर अंडरराइट कसे करतात ... ... | ३८३ |
| ९ खरेदी-विक्री सं.साधट्या | ३८४ |

# अर्थ

बुधवार, ता. २२ नोव्हेंबर, १९४४

## असेंब्लीमधील कांहीं प्रश्नोत्तरें

उद्योगधंदेवाल्यांची एक परिषद सध्यां अमेरिकेंत युद्धोत्तर कालांतील आंतराष्ट्रीय व्यापाराचे संबंधांतील प्रश्नांची चर्चा करीत आहे आणि तींमध्यें ह्या देशांतून गेलेल्या हिंदी धंदेवाल्यांचे प्रतिनिधी भाग घेत आहेत. ह्या शिष्टमंडळाचें नेतृत्व सर चुनिलाल भाईचंद मेहता ह्यांचेकडे असून ते हिंदी धंद्यांची परिस्थिति व गरजा ह्यांविषयीं येथील लोकमत अमेरिकन जनतेपुढें स्पष्टपणें मांडीत असल्याच्या बातम्या इकडे प्रसिद्ध होत आहेत. स्टर्लिंग शिलकी, डॉलर हुंड्या, हिंदुस्थानचा युद्धखर्च व त्याचा ह्या हुंड्यांवर परिणाम, हिंदी हुंडणावळीचा दर, आंतरराष्ट्रीय व्यापारांत ह्या देशाचें स्थान, हिंदी उद्योगधंद्यांचें भवितव्य, इत्यादि प्रश्नांवर त्यांनीं निर्भीड रीतीनें मतप्रदर्शन केलें आहे. इकडे मध्यवर्ती असेंब्लींत असल्या विषयांवर प्रश्न विचारून सभासदांनीं त्यांचें संबंधांत सरकारकडून माहिती काढण्याचा प्रयत्न चालविला आहे. ह्यांपैकीं कित्येक प्रश्नोत्तरांचे योगानें त्यांबाबतच्या परिस्थितीवर विशेष उजेड पडला आहे असें मात्र म्हणतां येत नाहीं. विधिमंडळांत विचारण्यांत येणाऱ्या प्रश्नांचें स्पष्ट उत्तर देणें कित्येक वेळां सरकारास गैरसोयीचें असतें आणि कांहीं प्रश्न अप्रस्तुत असतात व कांहींचीं खुलासेवार उत्तरें देणें सरकारचे मतानें सार्वजनिक हितास पोषक नसतें. ह्यामुळें माहितीच्या दृष्टीनें अनेक प्रश्न निष्फळ होतात आणि त्यांस देण्यांत आलेल्या उत्तरांत माहितीचा पूर्ण अभाव असतो.

अलीकडे हिंदुस्थानांत रिझर्व्ह बँकेमार्फत सोन्याची विक्री होत आहे त्यासंबंधांतील प्रश्नोत्तरें वरील वस्तुस्थितीचीं उत्कृष्ट निदर्शक आहेत. हें सोनें कोठून येतें आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांचे वतीनें येथें विकल्या जाणाऱ्या सोन्यापैकीं दक्षिण आफ्रिकेमधून किती येतें ह्याची आपणांस कांहीं माहिती नाहीं असें फडणवीस, सर जेरेमी राइस्मन, ह्यांनीं एका प्रश्नास उत्तर देतांना सांगितलें. युद्धसमाप्तीनंतर सोन्याची किंमत उतरण्याचा संभव असल्यानें तें विकत घेणाऱ्या जनतेचें नुकसान होऊं नये म्हणून त्याची विक्री सरकारनें थांबवावी ह्या सूचनेस उद्देशून ते म्हणाले कीं सोनें खरेदी करण्याची कोणावरहि सक्ती नाहीं आणि तें विकत घेणारास त्याच्या किंमतीच्या भवितव्याची कल्पना आहे. दक्षिण आफ्रिकेचें सोनें कोणत्या भावानें विकत घेण्याचा करार तो देश व इंग्लंड ह्यांमध्यें झाला आहे ह्या प्रश्नाशीं हिंदुस्थान सरकारास कांहीं कर्तव्य नाहीं असेंहि त्यांनीं पुढें सांगितलें. सरकारचे वतीनें हिंदी बाजारांत चांदीची विक्री होत आहे तिचा उपयोग व्यवहारांत खेळणाऱ्या चलनापैकीं कांहीं पैसा परत खेचून घेण्याकडे होईल असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

अमेरिकेवर निघणाऱ्या डॉलर हुंड्यांचा एक साम्राज्यनिधि ब्रिटिश सरकारनें निर्माण केला आहे, त्यासंबंधांत हिंदुस्थानच्या दृष्टीनें प्रश्न विचारण्यांत आले. ह्या निधींत हिंदुस्थानचा हिस्सा आहे त्याचा उपयोग ह्या देशास अमेरिकेंतून माल आणण्याकडे करतां येईल अशी व्यवस्था केली जाण्याची आवश्यकता हिंदी धंदेवाल्यांकडून प्रतिपादिली जात आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील देशांचें बाहेरील राष्ट्रांकडून येण्याबद्दलच्या हुंड्यांचा स्वतंत्र निधी बनवून युद्धकार्याकडे त्याचा विनियोग करण्याचें १९३९ सालीं ठरलें आणि ह्या व्यवस्थेस अनुसरून अगदी निकडीची मागणी असेल आणि ती युद्धप्रयत्नाशीं विसंगत नसेल तर तेवढ्या पुरता डॉलर्सचा पुरवठा केला जातो असें सर जेरेमी ह्यांनीं सांगितलें. जरूरीचे यंत्रांचे भाग हिंदी कारखानदारांस अमेरिकेंतून आणतां येत नाहींत ह्याचें कारण डॉलर हुंड्यांचा अभाव नसून त्या सरकारकडून पुरवण्यांत येत नाहींत ह्या तक्रारीस वरील उत्तर होतें. हिंदुस्थानावर युद्धखर्चाचा वाजवीपेक्षा अधिक बोजा पडतो व इंग्लंडच्या वतीनें येथें खरेदी केलेल्या मालाच्या योग्य किंमती दिल्या जात नाहींत असें कांहीं प्रश्नांत सुचविण्यांत आलें असतां त्यांस नकारात्मक उत्तरें सर जेरेमी ह्यांनीं दिलीं. ज्यांचा उपयोग झालेला नाहीं आणि होण्याचाहि संभव नाहीं अशा विमान गृहांवर पंधरा कोटि रुपये खर्च झाले आहेत कीं नाहीं असा प्रश्न विचारण्यांत आला असतां असल्या गृहांची आपणांस माहिती नाहीं असें त्यांनीं सांगितलें.

युनायटेड किंगडम कमर्शल कॉर्पोरेशन ह्या नांवाची ब्रिटिश सरकारच्या भांडवलावर व्यवहार करणारी एक व्यापारी कंपनी हिंदुस्थानांतून बाहेरच्या देशांत माल पाठवण्याचा धंदा करीत आहे. तिला मोठ्या प्रमाणांत नफा होतो आणि त्यावर प्रांतीवरील कर हिंदुस्थान सरकारनें घेतलेला नाहीं अशी टीका प्रश्नाचे मार्मानें करण्यांत आली. तिला उत्तर देतांना सर जेरेमी म्हणाले कीं ही कंपनी १९४१ मध्यें स्थापन झाली, तिच्या व्यवहाराची माहिती हिंदुस्थान सरकारास वेळच्या वेळ पुरवली जाते, तिला वाजवीपेक्षां फाजील नफा झालेला नाहीं आणि तिच्यावर प्राप्तीच्या कराची आकारणी रीतसर चालू झाली आहे. ह्या कामीं सरकारची दिरंगाई झाली आहे असें म्हणतां येत नाहीं आणि तपशीलवार हिशेब तयार करण्यास वेळ दिला पाहिजे असें त्यांनीं पुरवणीवजा सांगितलें. तलम कापडाचा हिंदुस्थानांत तुटवडा आहे, त्याचा फायदा घेऊन ब्रिटिश व अमेरिकन कारखानदार ह्या जातीचा माल इकडे पाठवण्याच्या तयारींत आहेत काय ह्या प्रश्नास व्यापार मंत्र्यांनीं असें उत्तर दिलें कीं वरील कापडाच्या आयातीस परवाने लागतात आणि ते देण्यांत आलेले नाहींत. त्यांनीं असेंहि सांगितलें कीं कोळसा व गिरण्यांस लागणारा इतर माल ह्यांविषयींची परिस्थिति अनुकूल झाल्यास हिंदी जनतेच्या उपयोगासाठी व जरूरीच्या निर्यातीकरितां मिळून पाचशे कोटि वार कापड उपलब्ध होऊं शकेल.

## " फेडरल कोर्टास कांहीं तरी काम द्या "—सर जॉन बोमंट ह्यांची सूचना

मुंबई हायकोर्टाचे सेवानिवृत्त सर न्यायाधीश, सर जॉन बोमंट, ह्यांनी ईस्ट इंडिया असोसिएशन ( लंडन ) मध्यें एक निबंध वाचला, त्यांत त्यांनी हिंदी संयुक्त ( फेडरल ) कोर्टाबाबत व्यक्त केलेल्या विचारांस हिंदुस्थानांत पुरेशी प्रसिद्धि मिळालेली दिसत नाहीं. सर जॉन बोमंट ह्यांच्या सारख्या अधिकारी गृहस्थांच्या, त्यांच्या अनुभवावर आधारलेल्या मतांस विशेष महत्त्व आहे. १९३५ च्या गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया ॲक्टानें हें फेडरल कोर्ट अस्तित्वांत आणलें. प्रत्येक फेडरल राज्यघटनेंत अशा कोर्टाची आवश्यकता असतेच. मध्यवर्ती फेडरल सरकार व फेडरेशनमध्यें सामील होणारे घटक ह्यांचेमधील वांधे व घटका-घटकांतील वांधे ह्यांचे निर्णय करण्याचें काम फेडरल कोर्टाचें असतें. परंतु " हिंदी फेडरेशनचा कोठेंच पत्ता नसतांना फेडरल कोर्ट अस्तित्वांत आणण्यांत घोडचूक झाली " असा सर बोमंट ह्यांचा अभिप्राय आहे. हिंदी फेडरल कोर्टास सध्या मुख्यतः कांहीं थोड्या विशिष्ट बाबतींत ( २०५ वें व २१३ वें कलम ) अपीलें ऐकण्याचेंच काम करावें लागतें; अव्वल ( ओरिजिनल ) अधिकाराचा उपयोग करण्याचा प्रसंग फेडरल कोर्टास येत नाहीं. " अशीं अपिलेंच केवळ ऐकण्यासाठी फेडरल कोर्टासारखें खर्चिक श्रीमंतीचें कोर्ट स्थापन करण्याची आवश्यकता नव्हती. फेडरल कोर्टाचा वार्षिक खर्च किमान २५,००० पौंड असेल, परंतु १९३७ सालापासून आतांपर्यंतची सरासरी काढली तर त्या कोर्टास वर्षांतून तीन ते चार आठवड्यांपेक्षां अधिक काम पडलेलें नाहीं. " प्रिव्ही कौन्सिल हें अपिलाचें अखेरचें कोर्ट आहे, तो दर्जा फेडरल कोर्टास देण्यांत यावा, अशी एक सूचना मध्यंतरी करण्यांत आली होती, ती अंमलांत आली असती तर इंग्लंडमध्यें अपिलांसाठी जावें लागलें नसतें. परंतु सर जॉन बोमंट हे मुंबई हायकोर्टाचे सर न्यायाधीश असतांनाच त्या हायकोर्टानें ह्या सूचनेस विरोध केला होता. बाकीचीं हायकोर्टें सूचनेस अनुकूल होतीं. स्थानिक हितसंबंध व मतें ह्यांपासून दूर असलेल्या व इंग्लंडमधील सर्वोत्कृष्ट न्यायाधीशांची बुद्धिमत्ता उपयोगांत आणूं शकणाऱ्या प्रिव्ही कौन्सिलची प्रतिष्ठा हिंदी फेडरल कोर्टास येणें अशक्य आहे, असें मुंबई हायकोर्टाचें म्हणणें होतें. तथापि, फेडरल कोर्टास रिकाम्या वेळांत कामास लावण्यासाठी इन्कम टॅक्सबाबत प्रकरणें त्याकडे सोपवावीं, अशी मुंबई हायकोर्टानें सूचना केली. इन्कम टॅक्सचा कायदा सर्व हिंदुस्थानास सारखाच लागू असल्या-कारणानें, त्याच्या अर्थासंबंधानें सर्वत्र एकवाक्यता असणें इष्ट आहे आणि त्यासाठी इन्कम टॅक्स कायद्याखालील प्रकरणांचा अखेरचा निर्णय एका मध्यवर्ती कोर्टाकडे असावा, अशी ही भूमिका होती. तथापि, " ही सूचना अंमलांत आलेली नाहीं व फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशांचा वेळ व जनतेचा पैसा ह्यांचा अपव्यय चालूच आहे " अशी सर बोमंट ह्यांची कडक टीका आहे. आज नाहीं तरी कालांतरानें फेडरल कोर्ट हेंच अखेरचें अपील कोर्ट असणें इष्ट आहे, असेंच सर बोमंट ह्यांचें मत आहे. वादी, प्रतिवादी व त्यांचे स्थानिक सल्लागार ह्यांच्या अनुप-स्थितींत, ६,००० मैल दूर अपिलाचें काम चालविण्यांतील तोटे सहज लक्षांत येण्याजोगे आहेत. प्रिव्ही कौन्सिलला स्थानिक परिस्थिति, संवयी, आचारविचार ह्यांची पूर्ण माहिती असणें अशक्य आहे. परंतु आजच्या अनिश्चित परिस्थितींत फेडरल कोर्टास अखेरच्या अपील कोर्टाचे अधिकार देण्यास त्यांचा विरोध आहे.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

# जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

" मागोरा "चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

# ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

**BUG COILS ( ABC )**

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

## स्फुट विचार

### व्यापारांत जनसेवा कीं नफेबाजी ?

समाजाची आधुनिक आर्थिक घटना व्यक्तिनिष्ठ नफ्याच्या पायावर उभारली गेली असल्यानें तिला भांडवलशाही हें दूषणात्मक नांव प्राप्त झालें आहे. तयार माल विकत घेणारी सामान्य जनता आणि मजुरी मिळवणारा कामकरी वर्ग ह्यांच्या हिताचें कांहींहि होवो, आपल्या पदरांत अधिकांत अधिक फायदा पडला म्हणजे झालें अशा भावनेनें व्यवहार करणाऱ्या धंदेवाल्यांच्या आपमतलबी वृत्तीचा निषेध ह्या नांवांत अभिप्रेत आहे. वास्तविक पहातां उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांस भांडवल पुरवणारे आणि त्यांचे व्यवहार करणारे लोक समाजास आवश्यक आणि उपयुक्त असलेली अशी कामगिरीच बजावीत असतात आणि व्याज व नफा ह्यांच्या स्वरूपांत त्यांस मिळणारा मोबदला हें त्यांच्या समाजकार्याचें मोल होय. परंतु नफा किती व कसा घ्यावा ह्यास प्रत्यक्ष व्यवहारांत मर्यादा रहात नाहीं आणि धंदेवाले वैयक्तिक फायद्याच्या मागें लागून समाजसेवेचें आपलें कार्य विसरतात असा सामान्य अनुभव येतो. त्यास अनुलक्षून बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या नामकरण समारंभाचे प्रसंगीं पाठवलेल्या आपल्या संदेशांत सर सोराबजी सकलातवाला ह्यांनीं त्या संस्थेच्या विद्यार्थ्यांस योग्य उपदेश करून त्यांच्या कार्याच्या खऱ्या उद्दिष्टाची त्यांस ओळख करून दिली हें योग्य झालें. हा संदेश मुळांत पुढें न आल्यानें 'अर्था'च्या गेल्या अंकांत त्याचा आशय अपेक्षेपेक्षां निराळ्या स्वरूपांत व्यक्त केला गेला. तो आतां उपलब्ध झाल्यानें सर सोराबजी ह्यांच्या संदेशाची पार्श्वभूमी आम्हीं वर विशद केली आहे. व्यापारांत नफा मिळवणें योग्य आहे, तरी स्वतःच्या सामाजिक कामगिरीस फायद्यापेक्षा कमी लेखणार नाहींत असे विद्यार्थी बृहन्महाराष्ट्र कॉलेज शिकवून तयार करील अशी आशा त्यांनीं व्यक्त केली. व्यापारांत पडणाऱ्या तरुणांनीं समाजास आवश्यक वस्तू व आर्थिक सुखसोयी योग्य किंमतींत पुरवून स्वतःच्या चरितार्थाचें साधन ह्या समाजसेवेच्या मोबदल्यांत मिळवावें आणि अशा रीतीनें स्वहित व लोकहित साधून सामाजिक प्रगतीस सहाय करावें असा त्यांचा उपदेश आहे. व्यापारांतील नफ्याचें सामाजिक तत्व आणि आर्थिक स्वरूप हीं त्यांनीं आपल्या संदेशांत मार्मिक रीतीनें स्पष्ट केलीं आहेत. त्यांकडे लक्ष देणें अगत्याचें आहे.

---

### स्वस्त अन्नाच्या पुरवठ्यास ब्रिटिश सरकारचें द्रव्यसहाय

इंग्लंडमध्यें अन्नपुरवठ्याची व्यवस्था आणि शिधापद्धतीची अंमलबजावणी पूर्णपणें यशस्वी झाली आहे हें प्रसिद्ध आहे. त्या देशांतील लोकांस लागणाऱ्या अन्नाचा मोठा भाग शांततेच्या काळांतहि बाहेरून आयात करावा लागतो. ह्या दृष्टीनें पहातां ब्रिटिश सरकारानें युद्धपरिस्थितींतहि लोकांच्या अन्नाचा पुरवठा अबाधित राखला आहे, एवढेंच नव्हे तर त्याच्या किंमतीहि मर्यादेपलीकडे जाऊं दिलेल्या नाहींत हें कौतुकास्पद आहे ह्यांत शंका नाहीं. 'हिंदी मध्यवर्ती विधिमंडळाच्या दोन्ही सभांत अन्नपुरवठ्याच्या सरकारी व्यवस्थेवर लोकनियुक्त सभासदांनीं कडक टीका नुकतीच केली. इंग्लंडमध्यें तेथील सरकारानें खाद्यपदार्थांचा पुरवठा किंमती वाढूं न देतां चालू ठेवण्यांत जें यश मिळवलें आहे तें त्यांच्या डोळ्यांपुढें असलें पाहिजे. तथापि सामान्य जनतेस महत्वाचे खाद्यपदार्थ स्वस्त किंमतींत मिळावे म्हणून ब्रिटिश सरकार आपल्या तिजोरींतून द्रव्यसहाय देत आहे ह्याची माहिती सर्वांस असणें आवश्यक आहे. ब्रेड, बटाटे, दूध, मांस, साखर, अंडीं इत्यादि पदार्थांच्या किंमती मर्यादेंत राखण्याकरितां आणि त्यांचा व्यापार करणारांचें नुकसान भरून काढण्यासाठी ब्रिटिश सरकार प्रतिवर्षी सुमारें २८० कोटि रुपये खर्चीत आहे. इंग्लंडमध्यें खाद्यपदार्थांची विक्री व त्यांच्या किंमती नियंत्रित आहेत आणि जनतेस अन्न स्वस्त भावानें पुरवलें जाण्यासाठी एवढें मोठें द्रव्यसहाय तें देत आहे. हिंदुस्थानांत सरकारनें ही व्यवस्था डोळ्यांपुढें ठेवून तीस अनुसरून येथें प्रयत्न करून पहाण्यासारखा आहे. लहान मुलांस दुधाचा पुरवठा करण्याचे बाबतींत अशा प्रकारची योजना मुंबई शहरांत अंमलांत आणलेली आहे. तिचा विस्तार केला जाणें अगत्याचें आहे. ब्रिटिश सरकार सध्या खाद्यपदार्थांच्या किंमती मर्यादेंत ठेवण्यासाठीं प्रतिवर्षी जो मोठा खर्च करीत आहे त्याची वाटणी खालीं दिली आहे:—

| | दशलक्ष पौंड |
|---|---|
| ब्रेड, पीठ | ६४ |
| मांस | २३ |
| बटाटे | २७ |
| अंडीं | १५ |
| साखर | १५ |
| दूध | १७ |
| चीज | ३ |
| बेकन | २ |
| इतर | ४८ |
| | २१४ |

---

### फूड ॲडव्हायसरी कौन्सिलचें गेल्या दोन वर्षांतील कार्य

मुंबई सरकारनें १९४२ सालीं एक फूड ॲडव्हायसरी कौन्सिलची योजना केली. मुंबई शहरांतील अन्नविषयक सर्व प्रश्नांवर सरकारला सल्ला देणें, हें ह्या कौन्सिलचें काम आहे. सरकारी व बिनसरकारी मिळून ३८ सभासदांचें तें बनलेलें आहे. रोजच्या निकडीच्या प्रश्नांच्या विचारासाठी कौन्सिलची एक स्टँडिंग कमिटीहि आहे. मुंबई सरकारच्या मुंबई शहरांतील अन्नपुरवठ्याच्या प्रश्नांबाबत कौन्सिलनें उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. त्याची माहिती देणारें १६ पृष्ठांचें एक चोपडें मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. दूध, कापड, केरोसीन, औषधें, इत्यादिसंबंधांतील प्रश्नांकडे कौन्सिलनें लक्ष पुरविलें असलें, तरी धान्य पुरवठ्याचा प्रश्न हाच सर्वांत महत्त्वाचा होता, हें उघड आहे. ( १ ) मुंबई शहरासाठी हिंदुस्थानाबाहेरून, इतर प्रांतांतून व मुंबई प्रांतांतून धान्य मिळविणें, ( २ ) मिळविलेल्या साठ्या अपव्यय थांबवून जतन करणें, ( ३ ) मिळविलेलें व जतन केलेलें धान्य योग्य प्रमाणांत वाटणें व ( ४ ) प्रमुख व अत्यावश्यक धान्यांच्या किंमती मर्यादेंत राखणें ( तुटीप्रमाणें महागाईहि उपासमारीस कारणीभूत होते ). ह्या चारी बाबतींत फूड ॲडव्हायसरी कौन्सिलनें सरकारास योग्य मार्गदर्शन केलें.

मुंबई शहरांतील रेशनिंग सर्व हिंदुस्थानास नमुनेदार झालें आहे, हें सुप्रसिद्धच आहे. प्रस्तुत पुस्तिकेस गव्हर्नरांचे सल्लागार सर हेन्री नाइट ह्यांनी आठ ओळींची प्रस्तावना लिहून फूड अॅडव्हायसरी कौन्सिलचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. पुस्तिकेची किंमत आठ आणे आहे.

---

### अमेरिकन गिरण्यांतील यंत्रांची कार्यक्षमता व युद्धोत्तर स्पर्धा

सर फ्रँक प्लँट ह्यांच्या नेतृत्वाखालीं ब्रिटिश गिरण्यांच्या प्रतिनिधींचें एक मंडळ नुकतेंच अमेरिकेस गेलें होतें. त्या मंडळानें आपला अहवाल सादर केला आहे, तो पहातां ग्रेट ब्रिटनच्या मानानें अमेरिकेनें किती प्रचंड प्रगति केली आहे हें दिसून येतें. अमेरिकेच्या स्पर्धेत ब्रिटिश गिरण्यांचा टिकाव लागून त्यांचेशी हिंदी गिरण्यांस पुढें स्पर्धा करावी लागणार आहे, हें येथें लक्षांत घेतलें पाहिजे. हिंदुस्थानांतील गिरण्यांची यंत्रसामुग्री ब्रिटिश यंत्रसामुग्रीच्या नमुन्याचीच असल्याकारणानें, युद्धोत्तर काळांत हिंदी गिरण्यांची अमेरिकन गिरण्यांबरोबर तुलनाच करतां येणार नाहीं, कारण हिंदी गिरण्यांतील यंत्रें जुनीं व फार वापरलेलीं आहेत. गेल्या तीस वर्षांत ब्रिटिश गिरण्यांनीं कांहींहि प्रगति केलेली नाहीं; अमेरिकन गिरण्यांतील प्रत्येक क्रिया तत्सम ब्रिटिश क्रियेच्या मानानें अधिक कार्यक्षम झालेली आहे. सूत काढण्याचे बाबतींत अमेरिकन गिरण्यांपेक्षा ब्रिटिश गिरण्यांना २२% ते ९८% अधिक खर्च येतो व कापड विणण्याची मजुरी पाहिली, तर ब्रिटिश गिरण्यांना तिचेपायीं १२९% ते २०३% ज्यास्त रकम खर्चावी लागते. अर्थात्, ह्याचें कारण, ब्रिटिश यंत्रसामुग्रीपेक्षा अमेरिकन यंत्रसामुग्री फारच कार्यक्षम आहे, हें होय. अमेरिकेंतील एकूण मागांपैकी ९५% माग ऑटोमॅटिक आहेत, तर ग्रेट ब्रिटनमधील फक्त ५% माग ऑटोमॅटिक आहेत ! त्या कारणानें, एक ब्रिटिश कामगार फार तर ६ ते ८ माग चालवूं शकतो, तर प्रत्येक अमेरिकन कामगाराकडे सुमारें ६० माग सोपविलेले असतात ! आधुनिक व अत्यंत कार्यक्षम यंत्रामुळें मजुरीचे खर्चांत होणारी बचत पुढील स्पर्धेच्या काळांत निर्णायक ठरणार आहे. आणि त्या बाबतींत हिंदी गिरणीवाल्यांना बरीच मजल मारावयाची आहे. जुन्या, मोडक्या यंत्रांवर काम करणाऱ्या कामगारांची कार्यक्षमता कमी होते व त्यास त्यामुळें मजुरीहि पुरेशी मिळणें अशक्य होतें, ह्या गोष्टीहि विचारांत घेतल्या पाहिजेत. युद्धानंतर नवीन यंत्रसामुग्री बसवावी लागेल, त्यावेळीं हिंदी गिरणीवाल्यांनीं दीर्घ दृष्टीनें सर्व प्रश्नांचा विचार केला पाहिजे.

---

### चंदनाचें तेल—म्हैसूरचें सबंद जगांत अग्रेसरत्व

सबंद जगांतील, चंदनाच्या एकूण झाडांपैकी ८५% झाडें एकट्या म्हैसूर संस्थानांत आहेत. पूर्वी हें सर्व लाकूड परदेशी निर्गत होई व तेथें त्यापासून तेल काढण्यांत येई. गेल्या महायुद्धाचे वेळीं चंदनी लाकडाची निर्गत बंद पडली, त्या संधीचा फायदा घेऊन म्हैसूर सरकारनें आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें चंदनी तेल काढण्याचा उपक्रम सुरू केला. म्हैसूरमधील चंदनी तेलाच्या कारखान्याइतका मोठा कारखाना जगांत दुसरा कोठेंहि नाहीं. चंदनी तेलाच्या एकूण उत्पादनापैकी ७५% उत्पादन म्हैसूर सरकारच्या कारखान्यांत होतें. कांहीं खासगी कारखानेहि तेल काढतात. जाचक जकातींपासून बचाव व्हावा ह्यासाठीं न्यूयॉर्क येथें म्हैसूर सरकार दरसाल ५० टन लाकडाचें तेल काढवून घेऊन अमेरिकन पेठेंत विकतें. सबंद जगांत दरसाल सुमारें २,५०० ते ३,००० टन लाकडापासून तेल काढण्यांत येतें. प्रत्येक टनापासून सरासरीनें १०५ ते ११० पौंड तेल निघतें. एकूण उत्पादनाच्या ९०% तेल सुगंधी मालांत वापरण्यांत येतें आणि बाकीच्या तेलाचा उपयोग औषधी कामाकडे केला जातो.

---

### सहशिक्षणाची बंदी यशस्वी ठरली

बारा वर्षांवरील मुलांमुलींसाठीं स्वतंत्र शिक्षणसंस्था असणें हितावह ठरल्यावरून विभक्त शिक्षणाची पद्धति रशियांत आणखी २८ शहरांत अंमलांत आणण्यांत आली आहे. त्यामुळें मुलांचें व मुलींचें वर्तन सुधारलें आहे, शिक्षकांचें छात्रगणावरील वजन वाढलें आहे व मुलें आणि मुली ह्यांचा एकमेकांबद्दलचा आदरही वाढला आहे. सहशिक्षण बंद केलें, ह्याचा अर्थ दोघांची शिक्षणाची पात्रता सम नाहीं, असा मात्र अर्थ नाहीं. चांगल्या वर्तणुकीसाठीं व व्यवस्थितपणासाठीं गुण देण्याची पद्धत रशियन शाळांत सुरू करण्यांत आलेली आहे. वडीलधाऱ्या माणसांस आदर दाखविणें, कांहीं ठराविक वयाखालील विद्यार्थ्यांनीं एकट्यांनीं सिनेमास न जाणें, वगैरे सुधारणा घडून आणलेल्या आहेत. रशियाच्या घटक प्रांतांत येत्या वर्षी सुमारें ८० हजार शिक्षकांची तूट भासेल, ती भरून काढण्याचा प्रयत्न चालू आहे. शिक्षकांचा पगार व रहाणीचा दर्जा ह्यांत वाढ करण्यांत आली आहे.

---

### हिंदी यांत्रिक हत्यारांच्या धंद्यास संरक्षण

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे हिंदुस्तान सरकारकडे नुकतेंच एक पत्रक धाडण्यांत आलें आहे. या पत्रकांत, अशा तऱ्हेची मागणी करण्यांत आली आहे, कीं "युद्धसमाप्तीनंतर हिंदी यांत्रिक हत्यारांच्या धंद्यास संरक्षण मिळेल" असें सरकारनें आश्वासन द्यावें.

यांत्रिक हत्यारें म्हणजे यंत्रें करणारी यंत्रें होत. लेथ्स, भोंकें पाडण्याचीं यंत्रें इ. यंत्रांचा यांत्रिक हत्यारांत समावेश होतो. शांततेच्या काळांत उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं व युद्धकाळांत युद्धसामुग्रीच्या उत्पादनासाठीं यंत्रांची व पर्यायानें हीं यंत्रें करणाऱ्या यंत्रांची अत्यंत मोठी जरूर आहे. यांत्रिक हत्यारांशिवाय कोणत्याही मोठ्या राष्ट्रांचें भागणें शक्य नाहीं. पाश्चात्य देशांत हा धंदा अत्यंत पुढारलेला आहे. त्या मानानें हिंदी यांत्रिक हत्यारांचा धंदा अजून बाल्यावस्थेंत आहे.

हिंदुस्थानांत हल्लीं लेथ्स, प्लेनिंग, ड्रिलिंग व शेपिंग मशीन्स व पॉवर प्रेसेस तयार होतात. आणखी कांहीं प्रकारची यंत्रेंही तयार करण्याचें घाटत आहे. ह्या धंद्यावर हल्लीं सरकारी नियंत्रण आहे. यामुळें कारखानदारांस शिलकी यंत्रें तयार करून ठेवणें शक्य झालेलें नाहीं. शिवाय युद्धकाळांत हा धंदा सुरू केल्यानें त्यांत बरेंच भांडवल गुंतवणें अपरिहार्य झालें आहे.

युद्धानंतर जर हिंदुस्थानची औद्योगिक वाढ व्हावयाची असेल तर या धंद्याची जोपासना होणें आवश्यक आहे.

श्री. चिं. का.

## शेअर अंडरराइट कसे करतात ?

कंपन्यांच्या भाग-विक्रीच्या जाहिरातींत "अमुक भाग अमुक कंपनीनें अथवा व्यक्तीनें अंडरराइट केले आहेत" अशा अर्थाचा मजकूर पुष्कळ वेळां आपण वाचतों. जे भाग लोकांत खपले जाणार नाहींत, ते सर्व किंवा त्यापैकीं कांहीं ठराविक भाग घेण्यास जो तयार असतो, त्यास अंडररायटिंग म्हणतात. अंडरराइट करणारी कंपनी किंवा व्यक्ति आपल्यावरील जबाबदारी कमी करण्याच्या दृष्टीनें, इतरांशीं असेच अंडररायटिंगचे करार करते. समजा, एका फर्मनें एका कंपनीनें विक्रीस काढलेले सर्व १,००,००० शेअर्स अंडरराइट केले आहेत, व ठराविक दिवशीं त्यासाठी डिपॉझिट ठेवण्याचें तिनें कबूल केलें आहे. हे शेअर्स उघडपणें विक्रीस निघण्यापूर्वी अंडररायटर फर्म त्यापैकी शक्य तेवढे शेअर्स दुसऱ्यांकरवीं अंडरराइट करवून घेते व त्याचे पैसे गोळा करून कंपनींत भरते. समजा, अशा रीतीनें ६० हजार शेअर्सबाबत फर्मची जबाबदारी इतरांनीं उचलली, तर फक्त ४० हजार शेअर्सबाबत जबाबदारी फर्मवरती उरते. जोंपर्यंत शेअर्सची उघड विक्री चालू आहे, तोंपर्यंत अंडरराइट करणाऱ्या फर्मचे नांवें शेअर्स ॲलॉट केले जात नाहींत. सर्वच्या सर्व शेअर्स लोकांत खपले गेले, तर अंडरराइट करणाऱ्या फर्मची जबाबदारी आपोआपच संपते. परंतु वरील ४० हजार शेअर्सपैकी कांहीं शेअर्स न खपतां उरले तर बाकीचे शेअर्स अंडरराइट करणाऱ्या फर्मचे गळ्यांत पडतात. एकाद्या कंपनीच्या १,००,००० शेअर्सपैकीं ५०,००० शेअर्स अंडरराइट करण्यांत आले व ८०,००० शेअर्स खपले, तर अंडरराइट करणाऱ्या फर्मवरील प्रमाणबद्ध जबाबदारीस अनुसरून, तिनें निम्मे शेअर्स अंडरराइट केले आहेत ह्यासाठी उरलेल्या २०,००० शेअर्सपैकी १०,००० शेअर्स त्या फर्मला स्वतः घ्यावे लागतील. अंडरराइट करणारी फर्म शेअरविक्रीची स्वतः जाहिरात करते त्यासाठीं व इतर कामासाठीं तिला १% ते १०% पर्यंत कमिशन मिळूं शकतें. अर्थात्, अंडरराइट करणाऱ्या फर्मवर पडणारी जोखीम व बाजारांतील प्रचलित व्याजाचा दर ह्यांवर कमिशनचा दर अवलंबून असतो. चांगल्या कंपन्यांच्या शेअर्सवर १% ते २% कमिशन पुरेल व ५% च्या वर कमिशनचा दर साधारणतः जाणार नाहीं. कंपनीच्या आर्टिकल्समध्यें घालून दिलेल्या मर्यादेंतच हा दर राहील, हें उघड आहे. फर्मला मिळणाऱ्या कमिशनच्या दरापेक्षां शक्य तेवढ्या कमी दरानें शेअर्स सब-अंडरराइट केले जातात, म्हणजे इतर व्यक्ती व फर्म ह्यांचेकडून ठराविक शेअर्सची हमी घेतली जाते. कधीं कधीं सब अंडररायटिंग कमिशनबरोबर ओव्हररायडिंग कमिशनहि अंडरराइट करणाऱ्या फर्मला दिलें जातें. कंपनीच्या अंडररायटिंगच्या एका व्यवहाराचें उदाहरण घेऊन, ह्या हिशेबाचा खुलासा चांगला होईल.

एका कंपनीनें प्रत्येकी १० रुपयांचे ५० हजार शेअर्स विक्रीस काढले व तिनें "क्ष" फर्मशीं ४% अंडररायटिंग व १% ओव्हररायडिंग कमिशनच्या अटीवर अंडररायटिंगचा करार केला. पुढें "क्ष" नें 'अ' शीं २०,००० व 'ब' शीं १०,००० शेअर्सचा सब अंडररायटिंगचा करार केला. कंपनीकडून "क्ष" ला २५,००० रुपये मिळतील, त्याची वाटणी खालीलप्रमाणें होईलः—

| | | शेअर्सची किंमत (रु.) | कमिशन (रु.) |
|---|---|---|---|
| "क्ष" नें अंडरराइट केलेले | | ५,००,००० | |
| पैकीं सब अंडरराइट केलेले | | | |
| 'अ' | २,००,००० | | |
| 'ब' | १,००,००० | | |
| | | ३,००,०००@१% | ३,००० |
| | | २,००,०००@४% व १% | १०,००० |
| | | | १३,००० |
| 'अ' | | २,००,००० @ ४% | ८,००० |
| 'ब' | | १,००,००० @ ४% | ४,००० |
| | | ५,००,००० | २५,००० |

अंडररायटिंगचा व्यवहार, ही एक प्रकारची सोडतच असते. विक्रीस काढलेले सर्व शेअर्स खपले तर अंडररायटरला कमिशन मिळतें, परंतु शेअर गळ्यांत पडत नाहींत. सर्व शेअर्स खपले नाहींत, तर करारांत ठरल्याप्रमाणें शेअर्स अंडररायटरला स्वतः घ्यावेच लागतात. शेअरविक्रीवर देण्यांत येणारें कमिशन हें वेगळ्या स्वरूपाचें असतें. ठराविक भाग खपवले तर ठराविक कमिशन मिळावयाचें असा हा व्यवहार असतो. अंडररायटिंगचा व्यवहार करणारी कंपनी, फर्म अथवा व्यक्ती हिची न खपलेले भाग स्वतः घेण्याइतकी आर्थिक पात्रता असणें आवश्यक आहे. अशी त्यांची पात्रता असल्याबद्दल डायरेक्टरांनीं आपली खात्री करून घेणें जरूर असतें. शेअर्सप्रमाणें सरकारी व निमसरकारी रोखेहि अंडरराइट करण्याची पद्धति आहे. ऑगस्ट १९४४ मध्यें मुंबई, मद्रास प्रभृति सहा प्रांतिक सरकारांची कर्जें विक्रीस निघालीं, तीं जाहीर केलेल्या मुदतींत न खपल्यामुळें अंडररायटर्सना कांहीं रकमेचीं कर्जें स्वतः घ्यावीं लागलीं, हें प्रसिद्ध आहे. सरकारी व निमसरकारी रोख्यांचे बाबतींत अंडररायटिंगचा दर अल्प असणार हें उघड आहे. अर्थात् रोख्यांवरील व्याजाचा दर व परिस्थिति ह्यावर कर्जास मागणी येणार हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सुरक्षितपणाच केवळ उपयोगी नाहीं, कर्जावर पडणारें व्याज ही बाबहि महत्त्वाची आहे, आणि जनतेस कर्जरोखे आकर्षक वाटले नाहींत, तर अंडररायटर्सना पुढें येऊन स्वतः कर्जासाठीं अर्ज द्यावे लागतील, हें स्पष्ट आहे. रोखे अंडरराइट करणारा, आपली जबाबदारी कमी करण्यासाठी ह्या रोख्यांच्या खपाची अंशतः जबाबदारी उचलणारांत शक्य तेवढे रोखे वाटून देतो.

---

### प्रदर्शन

दिपवाळीनंतर रांगोळी व किल्ला हीं दोन प्रदर्शनें दरसाल होत असतात. त्यांतच चालू साली हलत्या चित्रांच्या प्रदर्शनाची नवीन भर पडली. हें प्रदर्शन पुणें येथील फाईन आर्ट वर्क्सनें सुरू केलें असून पहाणारांची गर्दी होत आहे. याच्यामध्यें उषास्वप्न, कृष्णजन्म, तपोभंग, वेणुनाद वगैरे चित्रें असून त्यांची हालचाल प्रसंगास योग्य अशा वेळीं होत असते. प्रदर्शनाची व्यवस्था आर्ट वर्क्सचे श्री. मिश्र हे खासीनें ठेवीत असून डिसेंबर अखेरपर्यंत तें चालू राहणार आहे.

## सहकारी खरेदी विक्री-सोसायट्या यशस्वी कशा होतील ?

### सहकारी मनोवृत्तीची आवश्यकता

आपणाकडे खरेदी-विक्री सोसायट्यांचा प्रसार अद्यापि व्हावा तसा झाला नाहीं. सहकारी खरेदी-विक्री सोसायट्या चालविण्यास लोकांचें सहकार्यच मनापासून मिळत नाहीं असा अनुभव येतो. बहुधा शेतकऱ्याचे शेतांत पीक यावयास सुरवात झाल्याबरोबरच त्या खेड्यांतील अडत्यामार्फत नजीकच्या शहरांतील व्यापारी आपल्या कुटुंबांना खर्चासाठी कांहीं रक्कम व धान्य ठेवण्यास पोतीं पुरवून आपलीं गिऱ्हाइकें बांधून टाकतो व मग सहजच त्या शेतकऱ्यास आपला सर्व माल त्या व्यापाऱ्यास विकणें क्रमप्राप्त होतें. पीक आल्याबरोबर पडेल त्या भावांत तें विकून टाकल्यामुळें चढत्या भावाचा फायदाही त्यास मिळत नाहीं. माल थोडा असल्यामुळें त्या मालाची प्रतही त्यास लावतां येत नाहीं व अर्थातच हा सर्व फायदा त्या व्यापाऱ्यासच मिळतो.

सेल व परचेस सोसायट्यांत मालाची प्रतवारी लावणें, योग्य भाव येईपर्यंत माल शिल्लक ठेवणें व जरूर लागल्यास त्याच मालतारणावर सभासदाला कर्ज देऊन त्याची खर्चाची ओढ तात्पुरती कमी करणें इ. सोई केल्या असतांना सुद्धां सेल व परचेस सोसायटीमार्फत व्यवहार करण्याची गोडी अद्याप शेतकऱ्यांस लागलेली दिसत नाहीं. याचा अर्थ, अशा तऱ्हेनें माल विकणें शेतकऱ्याला गैरसोईचें तरी वाटत असावें अगर सोसायट्यांमार्फत माल विकल्यामुळें होणारा फायदा त्यांच्या लक्षांत तरी येत नसावा.

वास्तविक आपल्याकडील शेतकऱ्यांत जमा-खर्चाचा हिशेब करून त्याप्रमाणें व्यवहार करण्याची अगोदर पद्धतच कमी. सर्व साधारण येईल ती जमा व होईल तो खर्च असाच त्यांचा व्यवहार असतो, अशामुळें त्यांतल्यात्यांत माहितगार इसमच त्यांचा सर्वसाधारण पुढारी बनतो व त्याच्या सल्ल्यानें प्रत्येक गोष्ट चालते. हे पुढारी साहजीकच आपल्या वजनाचा फायदा करून घेण्याच्या मार्गाला लागतात व कोणतेंही कार्य करावयाचें झाल्यास यांच्या सहाय्याशिवाय होतच नाहीं. हाच अनुभव ' क्रेडिट ' सोसायट्यां आपणाकडे स्थापन करतेवेळीं आला.

याशिवाय अशा सोसायट्या चालवण्यास विश्वासू व कर्तबगार नोकरवर्गाची अत्यंत आवश्यकता असते. पगार कामाच्या मानानें कमी, मोहाच्या जागांस भरपूर वाव, अशी परिस्थिति झाल्यावर त्यांतून तावून सुलाखून निघालेल्या नोकरवर्गासही आणखी बऱ्याच आपत्तींना तोंड द्यावयाचें असतें. सोसायटींत भांडणें व तट असल्यास नोकरवर्गाच्या कामाचें चीज होतेंच असें नाहीं. व्यापारांतील माहितगार लोक स्वतः धंदा करण्याची शक्यता असल्यामुळें या भानगडींत सहसा पडावयास तयार असत नाहींत. पडल्यास त्यांचा उपयोग नेहमींच सोसायटीस इष्ट होईल असें सांगतां येत नाहीं.

तात्पर्य, सोसायट्यांचा प्रसार करतेवेळींच त्याबरोबर लोकांमध्यें सहकारी तत्त्वाचा प्रसार करून व्यापार व उद्योगधंद्याची अद्यावत् माहिती घेतलेला विश्वासू व कार्यक्षम नोकरवर्गही निर्माण करण्याची आवश्यकता अद्यापीहि तीव्रतेनें जाणवत आहे.

एच. व्ही. सहस्रबुद्धे


पूना गेस्ट हाऊस



टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

- श्रीमंत कसें व्हावें ? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! किं. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! किं. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक ! किं. १ रु. लिहा. विपट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

-राष्ट्रीय काटकसर-

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंगबाबतची अडचण लक्षांत घेऊन—

-गोल्डन कोको-

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, " गोल्डन कोको "

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें १.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. धोंडो वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.